**<u>सी.एन.आर. नं. एमएचएसआय ०७ –०००००८७–२०१०</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. ६५/२०१० मधील नि.क्र. १३० वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतींचे वाटप होवून मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १इ हिने तिच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, सदर प्रतिवादीने तिची कैफियत विहित मुदतीत सादर न केल्याने तिच्याविरुध्द दि. १७/०१/२०१८ रोजी दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. कैफियत दाखल करण्यास तिने जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर प्रतिवादीस महत्त्वाची कागदपत्रे वेळेवर मिळालेली नव्हती. त्यामुळे तिला तिच्या विधीज्ञाला भेटून माहिती व कागदपत्रे देता आली नाहीत. तिला तिची बाजू मांडण्याची आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १इ हिच्याविरुध्द नि.क्र. १ वर दि. १७/०१/२०१८ रोजी झालेला आदेश रद्दबातल होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती सदर प्रतिवादीने केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर वादीने आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्जात प्रतिवादी क्र. १ इ हिने योग्य कारण दिलेले नाही. अर्जात सदर प्रतिवादीने गाळलेल्या जागा पेनाने भरुन तारखा नमूद केलेल्या असून; त्याठिकाणी स्वाक्ष–या केलेल्या नाहीत. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; नि.क्र. १ वर दावा प्रतिवादी क्र. १इ हिच्या कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश दि. १७/०१/२०१८ रोजी पारीत झालेला आहे. सदरील आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी प्रतिवादी क्र.

१इ हिने दि. २८/०६/२०१८ रोजी अर्ज दाखल केलेला आहे असे दिसून येते. अर्जातील नमूद कारणे प्रथमदर्शनी संयुक्तिक वाटत नाहीत. तरीपरंतु, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, नि.क्र. १ वरील दि. १७/०१/२०१८ रोजीचा आदेश रद्दबातल करणे उचित राहील. प्रतिवादी क्र. १इ हिने कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब पाहता; तिच्यावर रक्कम रुपये ३००/— इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवविण्याचा आदेश करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ इ हिच्यावर रक्कम रु. ३००/— (रक्कम रुपये तीनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. १७/०१/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ इ हिच्याविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १इ हिने वादीस पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—१८ जुलै, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.